गडचिरोली. दिनांक १०/०७/२०१७

# पोलीस-नक्षल चकमकीत जहाल महिला नक्षलवादयास कंठस्नान

- ## हत्यारासह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त

गोपनिय माहीतीच्या आधारे उपविभाग धानोरा अंतर्गत मौजा रानवाही जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दलाचे विशेष अभियान पथक नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना आज दिनांक १०/०७/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. च्या दरम्यान पोलीस नक्षल चकमक झाली. चकमकीनंतर शोधमोहीम राबविली असता एक जहाल महीला नक्षलवादी व हत्यारासह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त करण्यात पोलीसांना यश आले आहे.

मौजा रानवाही जंगल परीसरात पोलीस पथक नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना जंगलात दबा धरुन बसलेल्या अज्ञात नक्षलवादयांनी पोलीस पथकांच्या दिशेने पोलीसांना जिवे मारण्याच्या उददेशाने अंदाधुंद गोळीबार केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल स्वसंरक्षणार्थ नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. चकमकी दरम्यान एका जहाल नक्षलवादयाला कंठस्नान घालण्यात पोलीस दलाला यश प्राप्त झाले. नक्षलवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

चकमकीनंतर पोलीस पथकांनी घटनास्थळाचा शोध घेतला असता घटनास्थळावर एका जहाल महीला नक्षलवाद्याचा मृतदेह तसेच एक १२ बोअर रायफल या हत्यारासह पिट्टू, दररोज वापराचे साहीत्य, नक्षल लिखीत साहीत्य असे मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात गडचिरोली पोलीसांना यश आले आहे. मिळुन आलेल्या मृत नक्षल्याची ओळख पटविण्याचे कार्य सुरु असल्याने त्याबाबत सविस्तर माहिती प्रकाशित करण्यात येईल.

चकमकीनंतर सदर जंगल परिसरात तीव्र नक्षल विरोधी शोध मोहिम राबविण्यात येत आहे.